**राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांर्तगत औषधे व औषधी साहित्य खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१९/प्र.क्र.१२२/आरोग्य-८**

नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९.

**संदर्भ-**

१) सह संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/ खरेदी कक्ष/सन२०१९-२०/राज्यअनुदान/औषधे व औषधे साहित्य खरेदीस प्रशा.मान्यता/१५६६-७०/१९, दिनांक २४.६.२०१९

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७

**प्रस्तावनाः-**

सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २४.६.२०१९ अन्वये प्रस्तावित केलेले लेखाशिर्ष क्र. २२१००६७४, २२१००१९१, २२१०५१७५ या लेखाशिर्षांमध्ये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत तरतूद रु. ६,६४,८५,०००/- इतकी असून सद्यस्थितीत बीडीएस प्रणालीवर ६० टक्के वितरीत तरतूद रु. २,४५,२८,०००/-इतकी आहे. तथापि, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी रु. ६,३२,१६,२०२/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, दिनांक २६.७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये हाफकीन महामंडळ अंर्तगत खरेदी कक्षाकडूनच औषधे, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्याचे धोरण असल्याने हाफकीन महामंडळाकडून औषधी व इतर साधन सामग्री खरेदीसाठी निविदा मागवून त्या एल-१ निविदाकारास शोधण्यासाठी व खरेदीचे आदेश देईपर्यंत खुप उशिर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सप्टेंबर, २०१९ पासून निवडणूकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागल्यानंतर प्रशासकीय मान्यता देता येणार नाही. त्यामुळे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात मंजूर अनुदानाइतकी निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात यावी व सन २०१९ अखेरपर्यंत (३१ मार्च २०२०) बीडीएस प्रणालीवर वितरीत असलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करावा व उर्वरीत अर्थसंकल्पीत अनुदानाच्या मंजूरीसाठी त्वरीत प्रस्ताव शासनास सादर करावा, या अटीवर तसेच खालील अटींच्या अधिन राहून सोबतच्या विवरणपत्रातील यंत्रसामुग्री खरेदी

करण्यासाठी निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी रुपये ६,३२,१६,२०२/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय-**

वित्त विभागाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर अर्थसंकल्पातील अनुदानानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तथापि, सन २०१९ अखेर पर्यंत (३१ मार्च २०२०) बीडीएस प्रणालीवर उपलब्ध असलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करावा व उर्वरित अर्थसंकल्पीत अनुदानाच्या वितरणासाठी शासनास त्वरीत प्रस्ताव सादर करावा या तसेच खालील अटींच्या अधिन राहून सोबतच्या विवरणपत्रातील यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी रुपये ६,३२,१६,२०२/- (रु.सहा कोटी बत्तीस लाख सोळा हजार दोनशे दोन फक्त) इतक्या अर्थसंकल्पीत खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**विवरणपत्र**

| Sr. No | Name of Medicine/Material | Proposed Quantity | Approx rate per unit | Approx.Amount (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Culture Tubes or Universal Glass Bottles(McCartney Bottles) | 4000 | 45.00 | 180000.00 |
| 2 | Tab.Pyridoxine 25 mg | 1316250 | 0.80 | 1053000.00 |
| 3 | Microslides (Packet of 50slides) | 70000 | 29.30 | 2051000.00 |
| 4 | Tab.Pyridoxine 50 mg | 9422000 | 1.00 | 9422000.00 |
| 5 | Triple Layer Face Mask Each | 505440 | 1.01 | 510494.00 |
| 6 | Sputum Container | 3040000 | 1.70 | 5168000.00 |
| 7 | Centrifuge Tube 50 ml(Falcon Tube) | 815000 | 8.614 | 7020410.00 |
| 8 | Thermocol Boxes (2Sample size) | 19500 | 125.08 | 2439060.00 |
| 9 | X-Ray Films Green Base 12*15(Packet of 50 Films) | 8046 | 2377.12 | 19126308.00 |
| 10 | X-Ray Films Green Base 10*15 (Packet of 50 Films | 1726 | 2100.00 | 3624600.00 |
| 11 | Disposable N-95 Mask (Respirators) | 300000 | 36.00 | 10800000.00 |
| 12 | Tab.Cotrimaxazole DS | 1770000 | 1.029 | 1821330.00 |
| | | | **Total** | **63216202.00** |

**अटी :-**

१) सदरहू औषधी व औषध साहित्य खरेदीची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदर औषधी व औषध साहित्य खरेदीची विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal, इतर राज्याचे दरकरार National pharmaceutical pricing Authority (NPPA) यांच्या कडील उपलब्ध असलेल्या न्युनतम दर विचारात घेण्यात यावेत तसेच हाफकीन संस्थेतील सदर बाबींची खरेदी केली जात असल्यास अथवा झालेली असल्यास निविदेत प्राप्त झालेले न्युनतम दर विचारात घेवुन त्या दरांना अंदाजित दर म्हणून गृहित धरण्यात यावे व त्यानुसार निविदेकरीता मागणी नोंदवितांना औषधी,औषधे साहित्य व उपकरणांच्या संदर्भात अंदाजीत दर म्हणून नोंदविण्यात यावेत व खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा.सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदर खर्च खालील लेखाशिर्षातंगत उपलब्ध असलेल्या सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा,

अ) लेखाशिर्ष क्र.२२१००६७४ (०१) (११) बी.सी.जी.लस टोचणी व क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (राज्य क्षेत्र) (अनिवार्य) २१ पुरवठा व सामग्री या लेखाशिर्षांतर्गत व लेखाशिर्ष क्र-२२१००१९१ (०४)(०१) क्षयरोग रुग्णालये व आरोग्यधामे (राज्यक्षेत्र) (अनिवार्य)२१ पुरवठा व सामग्री

आ) लेखाशिर्ष क्रमांक-२२१०५१७५ (०१) (४९) बी.सी.जी. लस टोचणी क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम केंद्रपुरस्कृत योजना राज्य हिस्सा ५० टक्के (कार्यक्रम)-२१ पुरवठा व सामुग्री

८) सदर औषधी व औषध साहित्य खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी,

९) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०)शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

११) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

१२) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात मंजूर अनुदाना इतकी निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे व सन २०१९ अखेर पर्यंत (३१ मार्च, २०२०) पर्यंत बीडीएस प्रणालीवर वितरीत असलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करावा,व उर्ववरीत अर्थसंकल्पीत अनुदानाच्या वितरणासाठी त्वरीत प्रस्ताव शासनास सादर करावा.

**उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारीसंबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.**

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे ,

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८२०४५५३०९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.09.19 11:35:27 +05'30'

**(ज.स.तडवी)**

**अवर सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. परेल, मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
9) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११) निवडनस्ती (आरोग्य-८)